


AN INITIATIVE TO CONSERVE RAIN WATER

(ACTIVITY + AWARENESS)

Visit us : facebook page मैत्री थेंबाशी

# मैत्री थेंबाशी जलजागृती अभीयान दिग्रस

We are running a campaign in Digras town of Yavatmal District, Maharashtra State, to create awareness amongst citizens to promote rain water harvesting.

Our campaign consist of two parts.

1. Activity Program (Installation of RWH System)
2. Awareness Program (Create awareness amongst students about water conservation

# ACTIVITY PROGRAM

In this program we are giving request letters to individuals, institutes, offices to carry out rain water harvesting in their premises. We are providing all the technical support to the individual, institutes willing to install RWH System. Under this program we have completed 12 projects covering 30000 Sqft of Slab area which will help to harvest 25,00,000 litres of water into the earth's crust. Our activity campaign is getting overwhelming response from citizens. Every day we are getting phone calls from peoples for installing RWH Systems.

# SOME OF COMPLETED PROJECT UNDER CAMPAIGN



Name: Prashant Modani
Slab Area: 95 SQM
Type: Direct Well Recharge
Harvesting Capacity: 85000 Ltr



Name: Kalpataru Convent
Slab Area: 180 SQM
Type: Direct Well Recharge
Harvesting Capacity: 162000 Ltr



Name: Premlata Sonparote
Slab Area: 120 SQM
Type: Direct Well Recharge
Harvesting Capacity: 108000 Ltr




Name: Sukhkarta Hospital
Slab Area: 350 SQM
Type: Direct Well Recharge
Harvesting Capacity: 315000 Ltr




Name: Dinesh Laddha
Slab Area: 120 SQM
Type: Direct Borewell Recharge
Harvesting Capacity: 108000 Ltr




Name: Yashavant Raut
Slab Area: 100 SQM
Type: Direct Well Recharge
Harvesting Capacity: 90000 Ltr



Name: Hasbe Sir & Tayade Sir
Slab Area: 150 SQM
Type: Direct Well Recharge
Harvesting Capacity: 105000 Ltr




Name: Ashok Kayande
Slab Area: 90 SQM
Type: Direct Well Recharge
Harvesting Capacity: 81000 Ltr







अमृता हॉस्पीटल







# AWARENESS PROGRAM

| | | |
|---|---|---|
|  |  |  |
| School: Dreamland Convent, Digras<br>Students Present: 400 | School: Monitor Club, Digras<br>Students Present: 150 | School: Monitor Club, Digras<br>Students Present: 100 |
|  |  |  |
| School: Gurukul Convent, Digras<br>Students Present: 200 | School: Dinbai School, Digras<br>Students Present: 400 | School: Kalpataru Convent, Digras<br>Students Present: 60 |

# PUBLICITY GIVEN BY PRINT MEDIA TO CAMPAIGN

## ‘मैत्री थेंबाशी’ च्या माध्यमाने जल जागृती चा प्रयत्न

***विविध संस्थांचा पुढाकार *घरी रुफ वॉटर हार्वेस्टिंग व तत्सम उपाय केल्यास मालमत्ता करात ५ टक्के सूट**

दिग्रस/ऋषिकेश हिरास

पाण्याचा प्रश्न दिवसेंदिवस बिकट होत चालला आहे. पुरेसा पाऊस पडून देखील उन्हाळ्यापर्यंत मात्र थेंब थेंब पाण्यासाठी लोकांना पायपीट करावी लागत आहे. या पाणी टंचाईला अनेक बाबी कारणीभूत आहे आणि ही परिस्थिती दिवसेंदिवस अधिकच बिकट होत जाणार आहे. यामुळे भविष्यात भयंकर जलसंकटाचा सामना करावा लागणार आहे. यावर संपूर्ण जगात मंथन होत आहे. यातून विविध संकल्पना पुढे येत असून असाच एक प्रयत्न येथे केला जात आहे. येथील विविध संघटनांनी संयुक्तपणे 'मैत्री थेंबाशी' हे अभियान सुरू केले असून पावसाळ्यात बरसणाऱ्या पावसाचे योग्य नियोजन कसे करता येईल याबाबत जल जागृती चे काम सुरू केले आहे.



लायन्स क्लब दिग्रसच्या पुढाकारात आणि श्री प्रभात क्रीडा मंडळ, श्री लक्ष्मीनारायण बालाजी मंदिर संस्थान, नॅशनल इंटिग्रेटेड मेडिकल असोसिएशन (निमा) दिग्रस, माणुसकीचा सेतू दिग्रस, केमिस्ट अँड ड्रगिस्ट

▶▶पान ३ वर...

विविध स्पर्धा : शाळा-महाविद्यालये, शासकीय कार्यालये, दवाखाने, दुकानांचा सहभाग

## दिग्रस येथे ‘मैत्री थेंबाशी-जलजागृती अभियान’

लोकमत न्यूज नेटवर्क

दिग्रस : येथील काही सुज्ञ नागरिकांनी जल-बचतीच्या 'मैत्री थेंबाशी जलजागृती अभियान' सुरु केले. या लहानशा अभियानाला सर्वस्तरातून भरघोस प्रतिसाद मिळत असल्याने आता हे अभियान जलचळवळ बनले आहे.

लुप्त होत असलेल्या जलस्रोतांना पुन्हा जिवंत करण्यासाठी लॉयन्स क्लब, श्री प्रभात क्रीडा मंडळ, श्री लक्ष्मीनारायण बालाजी मंदिर संस्थान, निमा, केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशन, माणुसकीचा सेतूसह इतर सामाजिक, धार्मिक व स्वयंसेवी संस्था यात सहभागी झाल्या आहेत. भूजल-पुनर्भरण किंवा जलपातळी वाढविण्याच्या दृष्टीने शहरातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालयांच्या इमारती, शाळा-महाविद्यालये, दवाखाने, घरे, व्यापारी प्रतिष्ठाने, धार्मिक स्थळे, सहकारी संस्थांच्या इमारतीवरील छताचे पाणी जमिनीत मुरविण्यासाठी 'रुफ वॉटर हार्वेस्टिंग' हा कृती कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. यासंदर्भात तांत्रिक सहकार्य, देखरेख व मार्गदर्शनाची जबाबदारी सदर मंडळीने घेतली आहे. १० ते २१ जुलैदरम्यान विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहे. आंतरशालेय निबंध, पोस्टर, लघु नाटिका अशा स्पर्धा होत आहे. या दरम्यान प्रत्येक शाळेत जाऊन 'पॉवर पॉइंट प्रेझेन्टेशन'द्वारे अभियानाचे महत्व पटवून देण्यात येत आहे. शहरात 'जल-साक्षरता रॅली' काढण्यात येणार असून स्पर्धांचे बक्षीस वितरण बालाजी मंदिर येथे होणार आहे.

अभियानाला प्रा. प्रशांत मोदानी यांचे मार्गदर्शन लाभत असून प्रा. सुधीर पाठक, डॉ. सुधाकरराव आसेगावकर, डॉ. मुरलीधर राठी, इदरीस डोसानी, डॉ. मनीष राठोड, डॉ. अशोक नालमवार, नीरज दुद्दलवार, दिनेश लढ्ढा, सुनील हरसुलकर, सुरेंद्र मिश्रा, अजय मोदानी, सुरेंद्र शर्मा, अल्फा रोकडे, डॉ. अपर्णा पाटील, डॉ. मनीष अटल, अतुल मोदानी, प्रा. नीता लाभसेटवार, प्रा. राजेश वानखडे, डॉ. यशवंत राऊत, सुदर्शन असबे, मजहर खान, अमीन चौहान आदींचे सहकार्य लाभत आहे.



मुख्याधिकारी टाले यांना अभियानाबाबत विनंतीपत्र देताना अभियानाचे कार्यकर्ते.

# दिग्रस येथे मैत्री थेंबाशी-जलजागृती अभियान जनचळवळीचे रुप

## असंख्य शाळा-महाविद्यालये, शासकीय कार्यालये, घरे, दवाखाने, दुकानांचा सहभाग, विविध स्पर्धांचेही आयोजन

दिग्रस- (ता.प्र.):

दिग्रस येथील काही दक्ष व सुज्ञ नागरिकांनी जलबचतीच्या उदात्त हेतूने सुरु केलेल्या लहानशा अभियानाला सर्वस्तरातून भरघोस प्रतिसाद मिळत असल्याने याला जनचळवळीचे रुप प्राप्त झाले आहे. अधिकांश नागरिक जल साक्षर झाल्यास भविष्यात उद्भवणारी शहरातील पाणी समस्या कायमस्वरुपी निकालात निघेल अशी अपेक्षा देखील सर्वत्र व्यक्त होत आहे. याबाबत सविस्तर असे की पाणी टंचाईवर कायमस्वरुपी मात करण्याच्या तसेच लुप्त होत असलेल्या जलस्त्रोतांना पुन्हा जिवंत करण्याच्या उद्देशाने लॉयन्स क्लब, श्री प्रभात क्रिा मंडळ, श्री लक्ष्मीनारायण बालाजी मंदिर संस्थान, निमा, केमिस्ट अॅन्ड ड्रगिस्ट असोसिएशन, माणुसकीचा सेतूसह इतर अनेक सामाजिक, धार्मिक व स्वयंसेवी संस्था सक्रियपणे सहभागी झाल्या आहेत. भूजल-पुनर्भरण किंवा जलपातळी वाढविण्याच्या दृष्टीने शहरातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालयांच्या इमारती, शाळा-महाविद्यालये, दवाखाने, घरे, व्यापारी प्रतिष्ठाने, धार्मिक स्थळे, सहकारी संस्थांच्या इमारतीवरील छताचे पाणी जमिनीत मुरविण्यासाठी रुफ वॉटर हार्वेस्टिंग हा कृती कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. पावसाचे पाणी जमिनीत मुरविण्याच्या उद्देशाने सर्वांना यंत्रणा बसवुन घेण्याची विनंती करण्यात विनंती करण्यात आली असुन या संदर्भात तांत्रिक सहकार्य, देखरेख व मार्गदर्शनाची संपुर्ण जबाबदारी सदर मंडळीने घेतली असुन या अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे.



शालेय विद्यार्थ्यांमध्ये जलजागृती करण्याच्या उद्देशाने १० ते २१ जुलै दरम्यान विविध स्पर्धा, उपक्रमांचे आयोजन देखील करण्यात आले आहे. आंतर शालेय निबंध, पोस्टर, लघु नाटिका अशा स्पर्धांच्या आयोजनाद्वार अधिकाधिक शाळा-महाविद्यालये व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्याचा मानस आयोजकांचा आहे.

या दरम्यान प्रत्येक शाळेत जाऊन पॉवर पॉईंट प्रेझेन्टेशनद्वारे विद्यार्थ्यांना पाण्याचे व सदर अभियानाचे महत्व पटवून देण्यात येईल. २० जुलै रोजी शहरात विशाल जल-साक्षरता रॅली काढण्यात येणार असुन २१ जुलै रोजी सर्व स्पर्धांचे बक्षिस वितरण श्री बालाजी मंदिर येथे संपन्न होईल. सदर अभियानाला प्रा. प्रशांत मोदानी यांचे तांत्रिक मार्गदर्शन लाभत असुन प्रा. सुधीर पाठक, डॉ. सुधाकरराव आसेगांवकर, डॉ. मुरलीधर राठी, इद्रीस डोसानी, डॉ. मनिष राठोड, डॉ. अशोक नालमवार, निरज दुद्दलवार, दिनेश लध्दा, सुनिल हरसुलकर, सुरेंद्र मिश्रा, अजय मोदानी, सुरेंद्र शर्मा, अल्फा रोकडे, डॉ. अपर्णा पाटील, डॉ. मनिष अटल, अतुल मोदानी, प्रा. निता लाभसेटवार, प्रा. राजेश वानखडे, डॉ. यशवंत राऊत, सुदर्शन असबे, मजहर अहमद खान, अमीन चौहान आदींचे सक्रिय सहकार्य लाभत आहे. एकंदरीत मैत्री थेंबाशी-जलजागृती अभियान जनचळवळीचे स्वरुप घेत असुन यामुळे शहरातील पाणी समस्या कायमची हद्दपार होईल, अशी आशा आहे.

---


दैनिक [illegible] — जिल्हा विशेष

# दिग्रस येथे 'मैत्री थेंबाशी-जलजागृती अभियान' घेतेय जन-चळवळीचे रुप!

## असंख्य शाळा-महाविद्यालये, शासकीय कार्यालये, घरं, दवाखाने, दुकानांचा सहभाग, विविध स्पर्धांचेही आयोजन

दिग्रस दि. १ (वार्ता.)

दिग्रस येथील काही 'दक्ष व सुज्ञ' नागरिकांनी जल-बचतीच्या उदात्त हेतूने सुरु केलेल्या लहानशा अभियानाला सर्वस्तरातून भरघोस प्रतिसाद मिळत असल्याने याला जन-चळवळीचे रुप प्राप्त झाले आहे. अधिकांश नागरिक 'जल-साक्षर' झाल्यास भविष्यात उद्भवणारी शहरातील पाणी समस्या कायमस्वरूपी निकालात निघेल, अशी अपेक्षा देखील सर्वत्र व्यक्त होत आहे. याबाबत सविस्तर असे की पाणी टंचाईवर कायमस्वरूपी मात करण्याच्या तसेच लुप्त होत असलेल्या जलस्रोतांना पुन्हा जिवंत करण्याच्या उद्देशाने लॉयन्स क्लब, श्री प्रभात क्रीडा मंडळ, श्री लक्ष्मीनारायण बालाजी मंदिर संस्थान, निमा, केमिस्ट अँड ड्रगीस्ट असोसिएशन, माणुसकीचा सेतूसह इतर अनेक सामाजिक, धार्मिक व स्वयंसेवी संस्था सक्रियपणे सहभागी झाल्या आहेत. भूजल-पुनर्भरण किंवा जलपातळी वाढविण्याच्या दृष्टीने शहरातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालयांच्या इमारती, शाळा-महाविद्यालये, दवाखाने, घरे, व्यापारी प्रतिष्ठाणे, धार्मिक स्थळे, सहकारी संस्थांच्या इमारतीवरील छताचे पाणी जमिनीत मुरविण्यासाठी 'रुफ वॉटर हार्वेस्टिंग' हा कृती कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. पावसाचे पाणी जमिनीत मुरविण्याच्या उद्देशाने सर्वांना यंत्रणा बसवून घेण्याची विनंती करण्यात आली असून या संदर्भात तांत्रिक सहकार्य, देखरेख व मार्गदर्शनाची संपूर्ण जबाबदारी सदर मंडळीने घेतली असून या अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे.



शालेय विद्यार्थ्यांमध्ये जलजागृती करण्याच्या उद्देशाने १० ते २१ जुले दरम्यान विविध स्पर्धा, उपक्रमांचे आयोजन देखील करण्यात आले आहे. आंतर शालेय निबंध, पोस्टर, लघु नाटिका अशा स्पर्धांच्या आयोजनाद्वारे अधिकाधिक शाळा-महाविद्यालये व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्याचा मानस आयोजकांचा आहे. या दरम्यान प्रत्येक शाळेत जाऊन 'पॉवर पॉईंट प्रेझेन्टेशनद्वारे' विद्यार्थ्यांना पाण्याचे व सदर अभियानाचे महत्व पटवून देण्यात येईल. २० जुले रोजी शहरात विशाल 'जल-साक्षरता रॅली' काढण्यात येणार असून २१ जुले रोजी सर्व स्पर्धांचे बक्षिस वितरण श्री बालाजी मंदिर येथे संपन्न होईल. सदर अभियानाला प्रा. प्रशांत मोदानी यांचे तांत्रिक मार्गदर्शन लाभत असून प्रा. सुधीर पाठक, डॉ. सुधाकरराव आसेगावकर, डॉ. मुरलीधर राठी, इदरीस डोसानी, डॉ मनीष राठोड, डॉ. अशोक नालमवार, नीरज दुद्दलवार, दिनेश लद्धा, सुनील हरसुलकर, सुरेंद्र मिश्रा, अजय मोदानी, सुरेंद्र शर्मा, अल्फा रोकडे, डॉ अपर्णा पाटील, डॉ मनीष अटल, अतुल मोदानी, प्रा नीता लाभसेटवार, प्रा राजेश वानखडे, डॉ यशवंत राऊत, सुदर्शन असबे, मजहर अहमद खान, अमीन चौहान आदींचे सक्रिय सहकार्य लाभत आहे. एकंदरीत, 'मैत्री थेंबाशी-जलजागृती अभियान' जन-चळवळीचे स्वरूप घेत असून यामुळे शहरातील पाणी समस्या कायमची हद्दपार होईल, अशी आशा बाळगू या!

Scanned with CamScanner

पुढारी

संक्षिप्त

## 'मैत्री थेंबाशी' जलजागृती अभियान

**दिग्रस :** येथील काही दक्ष व सुज्ञ नागरिकांनी जल-बचतीच्या उदात्त हेतूने सुरू केलेल्या लहानशा अभियानाला सर्वस्तरातून भरघोस प्रतिसाद मिळत असल्याने याला जन चळवळीचे रूप प्राप्त झाले आहे. अधिकांश नागरिक जल-साक्षर झाल्यास भविष्यात उद्भवणारी शहरातील पाणी समस्या कायमस्वरूपी निकालात निघेल, अशी अपेक्षा देखील सर्वत्र व्यक्त होत आहे. पाणी टंचाईवर कायमस्वरूपी मात करण्याच्या तसेच लुप्त होत असलेल्या जलस्रोतांना पुन्हा जिवंत करण्याच्या उद्देशाने लायन्स क्लब, श्री प्रभात क्रीडा मंडळ, श्री लक्ष्मीनारायण बालाजी मंदिर संस्थान, निमा, केमिस्ट अँड ड्रगीस्ट असोसिएशन, माणुसकीचा सेतूसह इतर अनेक सामाजिक, धार्मिक व स्वयंसेवी संस्था सक्रियपणे सहभागी झाल्या आहेत. भूजल-पुनर्भरण किंवा जलपातळी वाढविण्याच्या दृष्टीने शहरातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालययांच्या इमारती, शाळा-महाविद्यालये, दवाखाने, घरे, व्यापारी प्रतिष्ठाणे, धार्मिक स्थळे, सहकारी संस्थांच्या इमारतीवरील छताचे पाणी जमिनीत मुरविण्यासाठी रुफ वॉटर हार्वे स्टिंग हा कृती कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. पावसाचे पाणी जमिनीत मुरविण्याच्या उद्देशाने सर्वांना यंत्रणा बसवून घेण्याची विनंती करण्यात आली असून या संदर्भात तांत्रिक सहकार्य, देखरेख व मार्गदर्शनाची संपूर्ण जबाबदारी सदर मंडळीने घेतली असून या अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे. शालेय विद्यार्थ्यांमध्ये जलजागृती करण्याच्या उद्देशाने १० ते २१ जुलै दरम्यान विविध स्पर्धा, उपक्रमांचे आयोजन देखील करण्यात आले आहे. सदर अभियानाला प्रा. प्रशांत मोदानी यांचे तांत्रिक मार्गदर्शन लाभत असून प्रा. सुधीर पाठक, डॉ. सुधाकरराव आसेगावकर, डॉ. मुरलीधर राठी, इदरीस डोसानी आदी सहकार्य करीत आहेत.

# OUR TEAM

PROF. DR. PRASHANT MODANI
PROF. SUDHIR PATHAK
MRS. ALFA JAIN
DR. SUDHAKAR AASEGAONKAR
DR. MURLIDHAR RATHI
MR. IDRIS DOSANI
MR. ATUL MODANI
ADV. NIRAJ DUDDALWAR
MR. SURENDRA MISHRA
DR. MANISH RATHOD
DR. MANISH ATAL
MR. DINESH LADDHA
MR. AJAY MODANI
MR. MAZHAR KHAN
DR. ASHOK NALAMWAR
MR. KETAN PADMAWAR
MR. SUDARSHAN HASBE
PROF. SHARMA SIR
MR. ASHOK TAYADE
MR. ASHOK KAYANDE
MR. SHYAM PATIL
PROF. DR. APARNA PATIL
PROF. DR. WANKHADE
PROF. NEETA LABHSETWAR
MR. SUNIL HARSULKAR
MR. VIVEK JETHWA

## CONTACT PERSON


PROF. DR. PRASHANT O. MODANI
723, RIDDHI-SIDDHI,
SIDHIVINAYAK NAGAR,
DIGRAS-445203
DISTRICT: YAVATMAL,
STATE: MAHARASHTRA

9422866311, 7776052186, pramodani83@gmail.com